महाराष्ट्र शासन

**संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई**

४ था मजला, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, फोर्ट, मुंबई -४०० ००१

दुरध्वनी - (०२२) - २२६२०३६३-६५ संकेतस्थळ - med-edu.in

क्र.डीएमईआर-११०११/२/२०२५-सीईटीआयटी, दिनांक - २८ फेब्रुवारी, २०२५

परिपत्रक

विषय - महाविद्यालय आणि रुग्णालय परिसरात अधिष्ठाता, शिक्षक, विद्यार्थी, निवासी डॉक्टर्स व इतर डॉक्टर यांना ॲप्रन परिधान करणे आवश्यक असल्याबाबत.

राज्यातील आरोग्य विज्ञान महाविद्यालयांमधील अधिष्ठाता, शिक्षक, पदवी पुर्व/पदव्युत्तर/आंतरवासिता विद्यार्थी, निवासी डॉक्टर्स व इतर सर्व डॉक्टर्स हे महाविद्यालय आणि रुग्णालय परिसरात ॲप्रन परिधान करीत नसल्याची बाब निदर्शनास येत आहे. अधिष्ठाता, शिक्षक, पदवी पुर्व/पदव्युत्तर/आंतरवासिता विद्यार्थी, निवासी डॉक्टर्स व इतर सर्व डॉक्टर्स तसेच अध्यापकीय वर्ग व विद्यार्थी यांनी अध्यापन वर्गात तसेच प्रात्यक्षिका दरम्यान तसेच रुग्णसेवा बजावत असताना रुग्णालय महाविद्यालय आणि रुग्णालय परिसरात ॲप्रन परिधान करणे ही संबंधितांची नैतिक जबाबदारी आहे. मा.मंत्री, वैद्यकीय शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांनी उपरोक्त प्रकरणाची दखल घेवून राज्यातील आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाच्या सर्व महाविद्यालयांतील अधिष्ठाता, शिक्षक, पदवी पुर्व/पदव्युत्तर/आंतरवासिता विद्यार्थी, निवासी डॉक्टर्स व इतर सर्व डॉक्टर्स यांना महाविद्यालय आणि रुग्णालय परिसरात ॲप्रन परिधान करण्याबाबतचे निर्देश दिलेले आहेत. त्याअनुषंगाने वैद्यकीय शिक्षण संचालनालयाकडून संबधित अध्यापक, पदवी पुर्व/पदव्युत्तर/आंतरवासिता विद्यार्थी, निवासी डॉक्टर्स व इतर सर्व डॉक्टर्स यांनी ॲप्रन परिधान करण्याबाबत खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत.

१. अधिष्ठाता, शिक्षक, पदवी पुर्व/पदव्युत्तर/आंतरवासिता विद्यार्थी, निवासी डॉक्टर्स व इतर सर्व डॉक्टर्स यांनी ॲप्रन घालून महाविद्यालयात व रुग्णालयात आदर्श व शिस्तबध्द वातावरण तयार करावे. तसेच महाविद्यालय व रुग्णालय परिसरात ॲप्रन परिधान करणे सक्तीचे करण्यात यावे.

२. नियमित परिधान करणारे ॲप्रन शुभ्र पांढरा, स्वच्छ, निटनेटके आणि ॲप्रन परिधान केल्यानंतर त्यांची सर्व बटन्स लावलेली असणे इत्यादी असणे आवश्यक राहणार आहे.

३. आरोग्य विज्ञान अभ्यासक्रम हा व्यावसायिक अभ्यासक्रम असल्यामुळे त्यांचे महत्व लक्षात घेवून, महाविद्यालय आणि रुग्णालय परिसरामध्ये ॲप्रनचा वापर करण्याबाबत सर्व संबंधितांना कळवावे.

४. अधिष्ठाता, शिक्षक, पदवी पुर्व/पदव्युत्तर/आंतरवासिता विद्यार्थी, निवासी डॉक्टर्स व इतर सर्व डॉक्टर्स यांनी महाविद्यालय व रुग्णालय परिसरात ॲप्रन सक्तीचे असल्याबाबत परिपत्रक प्रसिध्द करावे व याबाबत जागरुकता वाढवी.

Scanned with ACE Scanner

५. ॲप्रन हा व्यवस्थितरित्या परिधान केलेलाच असावा, तो निव्वळ हातात असणे, खांदयावर ठेवणे, बॅगला लावलेला असणे इत्यादी बाबी प्रतिबंधित असाव्यात.

६. कोणत्याही शिक्षक, विद्यार्थी आणि निवासी डॉक्टर्स यांनी ॲप्रन परिधान केला नसल्यास किंवा ॲप्रन योग्यरित्या परिधान न केल्याचे निदर्शनास आल्यास एक वेळ मौखिक समज देण्यात यावी व दुस-या वेळेस लेखी स्पष्टीकरण घेण्यात यावे.

७. ॲप्रनचे महत्व आणि त्यामुळे होणारे फायदे याबाबतच्या सूचना संबंधितांना आपल्यास्तरावर परिपत्रक काढून देण्यात याव्यात.

८. आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाच्या महाविद्यालय व संलग्नीत रुग्णालयांमध्ये ॲप्रन परिधान करण्याबाबतच्या सूचना तातडीने सर्व संबंधितांना देण्यात याव्यात.

(डॉ.अजय चंदनवाले)
संचालक,
वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई

प्रति,
सर्व अधिष्ठाता / प्राचार्य,
राज्यातील आरोग्य विज्ञान अभ्यासक्रम
महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य.

प्रत माहितीकरिता सविनय सादर -
१. मा.मंत्री, वैद्यकीय शिक्षण यांचे खाजगी सचिव.
२. मा.सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
३. कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

Scanned with ACE Scanner